नारळ चोर





नारळ चोर

मराठी : अश्विनी बर्वे




1439639

एकेकाळी नारळांच्या झाडांच्या वनात एक स्वार्थी चित्ता आपल्या घरात राहत होता.



चित्ताच्या असा दावा होता की, वनातील सगळे नारळ त्याचे आहेत. त्याने धमकी दिली होती की, जर जॉनी एक जरी नारळ घेण्याचा प्रयत्न केला तर त्या प्राण्याचे तुकडे तुकडे करेन.



पण जेव्हा कासवाने त्याची धमकी ऐकली तेव्हा अजिबातच प्रभावित झाला नाही.

एक दिवस वनातले नारळ पिकले तेव्हा कासव आपला खरा मित्र कुत्र्याला भेटायला त्याच्या घरी गेला. त्यांनी हवापाणी आणि जीवन कसे कठीण झाले आहे याबद्दल गप्पा मारल्या.

अचानक कासवाने म्हटले, “मित्रा, चित्ताच्या वनातील नारळ पिले आहेत. तुला वाटत नाही का, नारळ खाण्याची हिच योग्य वेळ आहे.”

“मलाही असे वाटते,” कुत्रा म्हणाला, “कारण खूप दिवसांपासून मला नारळ खाऊ वाटते आहे. पण तुला तर माहितीच आहे, जो कोणी नारळ खाण्याचा प्रयत्न करेन, त्याचे चित्ता काय करेन ते?”

“ओह, त्या फुकाच्या गोष्टी आहेत,” कासव म्हणाले. “आणि निःसंदेह ते नारळ त्याचे नाहीत. चिंता करू नको, आपण काही ना काही मार्ग शोधू असा मला विश्वास आहे. उद्या सूर्योदयाच्या वेळी आपण प्रयत्न करू. तू माझ्या घरी येवून मला उठवशील का? तुला तर माहितीच आहे सकाळी लवकर उठणे माझ्यासाठी किती कठीण आहे.”

दुसऱ्या दिवशी सकाळी एक नवीन सुंदर पिशवी घेवून कुत्रा आला आणि त्याने कासवाच्या घराचा दरवाजा वाजवला.

“मी तयार आहे,” कासवाने झोपाळू आवाजात म्हटले. थोड्याच वेळात तो मोठी पिशवी घेवून बाहेर आला. दोन्ही मित्र नारळाच्या वनात गेले.



ते दोघे चुपचाप चालले होते. नाष्ट्याच्या आधी गप्पा मारायला आवडत नसे. शेवटी त्याने आपले मौन सोडले.

“एक गोष्ट तुला सांगायला विसरलो,” कासव म्हणाले. “कधी कधी झाडांवरून नारळ खाली पडते. काही नारळ तुझ्या डोक्यावरही पडू शकतात आणि त्याने फार वेदना होवू शकतात. मित्रा असं झालं तर तू ओरडायचे नाही असे वचन दे. तोंड दाबून वेदना सहन करशील.”

कुत्र्याने तिरस्काराने आपल्या मित्राकडे पाहिले. “अरे, जर चित्ताने आपला आवाज ऐकला तर आपण मरू,” तो म्हणाला. “तुला खरच वाटतं का मी इतका मूर्ख आहे का मी अशावेळी ओरडेन?”

“हे म्हणणं सोप्प आहे,” कासव उदासिंनतेने म्हणाले. “वास्तवात तू तिथून पळून जावून आपले प्राण वाचवू शकतो, पण मी लवकर पळू शकणार नाही कारण माझे पाय लहान आहेत.”

“मित्रा, घाबरू नको, ओरडणे तर दूरच मी कण्हर सुद्धा नाही,” कुत्र्याने वचन दिले. ते नारळाच्या पडण्याबाबत आपापसात बोलत बोलत झाडांच्या वनराईत आले.



कितीतरी मस्त, पिकलेले नारळ जमिनीवर पडलेले होते. कासव ते नारळ उचलून आपल्या पिशवीत टाकू लागला. खुशीने शेपूट हलवत कुत्रा इकडे तिकडे पळू लागला. नारळ ओढून आणून तो एकाजागी जमा करू लागला. त्यामुळे कासव नारळ उचलून पिशवीत पटकन भरू शकत होता.



अचानक जोरात आघात करत एक नारळ कासवाच्या पाठीवर पडले. पण जाड कवचा मुळे त्याला काही वेदना झाली नाही. आणि ते चुपचाप नारळ गोळा करत राहिला.

नारळ इतके चविष्ट होते आणि कुत्रा इतका उत्साहित झाला होता की तो कासवाने सांगितलेला धोका पूर्ण विसरून गेला.



थोड्यावेळा नंतर पानामध्ये काही हालचाल झाली आणि एक मोठे नारळ सरळ कुत्र्याच्या डोक्यावर येवून पडले.

“आऊ! आऊ! आऊ!” कुत्रा ओरडला. त्याने आपली पिशवी पाडली आणि कळवळत तो तिथून पळाला. आपला मित्र कासवाबद्दल त्याने जराही विचार केला नाही.

" अरे! त्याने माझ्याबरोबर असे का केले? घाबरलेले कासव म्हणाले, जवळ येणाऱ्या चित्ताची पावलं त्याने ऐकली. तो रांगतच वाळलेल्या पानाच्या खाली लपतांना त्याने चित्त्याला त्याच्याकडे येतांना पाहिले..

"चोर!" कुत्र्याची पिशवी बघून चित्ता रागाने म्हणाला, "मी तुला पकडतोच बघ."

चित्ता चोराला शोधू लागला. कासव एवढे घाबरले होते की, ते थरथर कापू लागले. भीतीने ते लाजाळूच्या झाडाकडून निघून एका मोठ्या झाडाजवळ येवून लपले.

पण त्या झाडाजवळून जातांना चित्ताने पाने बाजूला केली आणि त्याला कासव दिसले. त्याने कासवाच्या डोळ्यात भीती पाहिली.



"अहा! मी तुला पकडले., तो ओरडला. त्याने कुत्र्याची पिशवी उघडली आणि कासवाला उचलून त्या पिशवीत टाकू लागला. कासवाला माहित होते त्याची पिशवी जुनी आणि विरलेली होती.

"किती वाईट आहे की तुला नवीन पिशवीचा उपयोग करावा लागतो आहे."कासव म्हणाले. "मी खूप मळलेलो आहे, म्हणून माझी पिशवी वापरली तर बरे होईल."

"तू बरोबर म्हणतो आहेस," चित्ता म्हणाला. आणि त्याने कासवाला उचलून त्याच्या पिशवीत टाकले.



चित्ता काही पाउले गेला नाही तोच कासव पिशवी जिथे अधिक विरली आहे तिथे कुरतडू लागला. थोड्याच वेळात त्याने भोक पाडले आणि पिशवीतून तो बाहेर निघाला.

कासव गुपचूप गवतात लपून राहिले.जोपर्यंत चित्ता डोळ्याआड होत नाही. तो विचार करू लागला, कसे त्याच्या मित्राने त्याला असहाय्य अवस्थेत सोडून दिले. थोडासा नाराज झालेले कासव कुत्र्याला शोधायला निघाले.

विजयी भावाने चित्ता घरी आला आणि येताच त्याने घरच्यांना आदेश देवू लागला. त्याने बायकोला आदेश दिला की, लगेच पातेल्यात पाणी भरून चुलीवर ठेव. त्याने मुलांना आदेश दिला की, त्यांच्या मित्रांना जेवण्याचे निमंत्रण देऊन या.

जेव्हा त्याचे मित्र घरी आले तेव्हा चित्ताने मोठ्या शान मध्ये पिशवी उघडली. परंतु त्यात फक्त काही नारळच निघाले,कासव नाही. त्याचे मित्र हैराण झाले. ज्यांना चित्ता आवडत नव्हता ते पाहुणे आधी जोरात हसू लागले.

कारण तो स्वार्थी आणि निर्दयी होता. मग त्यांना वाटले की चित्ता त्यांची चेष्टा करत आहे. रागाने, ओरडत, गुरकावत, चिडून सगळे प्राणी त्यांच्या घरी गेले.

एवढ्या काळात कासवाने कुत्र्याला शोधून काढले. कुत्र्याने आपल्या वागणुकीबद्दल विस्ताराने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. शेवटी त्याने मान्य केले की, तो घाबरला होता. “आता बघ,” त्याने प्रामणिकपणे सांगितले की, “जर आता नारळ पडले तर अजिबात आरडाओरडा करणार नाही.” त्यावेळी कुत्रा आणि कासव परत प्रिय मित्र झाले.

काही दिवसानंतर एका सुखद दिवशी, त्यांनी ठरवलं की ते परत नारळ आणण्याचा प्रयत्न करतील. दुसऱ्या दिवशी सकाळी कुत्रा कासवाच्या घरी आला. परत एकदा ते नारळाच्या वनात आले.



जेव्हा ते तिथे पोहचले तेव्हा सगळं शांत होते.काही चांगले नारळ जमिनीवर पडले होते. दोन्ही मित्र पटापट आपल्या पिशवीत नारळ भरू लागले.

अचानक त्यांनी पानांमध्ये हालचाल ऐकली आणि एक मोठे नारळ सरळ कुत्र्याच्या डोक्यावर पडले. कुत्रा आपले वचन विसरला. धूम ठोकून, ओरडत पळाला.



जेव्हा वनापासून दूर एका सुरक्षित जागी पोहचल्यावर तो थांबला तेव्हा त्याचा आत्मा त्याला कोसू लागला. तो इतका भित्रा कसा झाला? तो एवढ्या मूर्खपणे कसा वागला? कासव नक्की आता चित्त्याच्या जाळ्यात फसेल. काय तो त्याच्या मित्राला वाचवू शकतो का? आपल्या कृत्यावर तो इतका दुःखी होता की त्याने कोणाचा तरी सल्ला घ्यावा असे वाटू लागले.

त्या जंगलात एक वृद्ध आणि खूप बुद्धिमान साप राहत होता. कुत्रा त्या सापाच्या घरी गेला. पण त्याला सापाला घडलेली गोष्ट सांगण्याची लाज वाटत होती. पण त्याने ती गोष्ट सांगितली. वृद्ध सापाने विचार केला, आणखीन एक चांगला विचार केला. मग त्याने कुत्र्याला एक योजना सांगितली.

“समुद्री किनारी जा आणि मोठे शंख आणि दगड गोळा कर. त्या सगळ्यांची वेलाला बांधून एक माळ तयार कर. ती माळ आपल्या गळ्यात घाल. जेव्हा तू चालशील तेव्हा ती माळ खूप आवाज करेल. मग नदी किनारी जावून वाट बघ. जेव्हा चित्ता नदीच्या जवळ येईल तेव्हा तू दगड आणि शंखाच्या साहय्याने जेवढा आवाज करू शकशील तेवढ कर. चित्त्याला वाटेल पाण्यात लपलेला भयंकर राक्षस आवाज करत आहे. आणि मग तो घाबरून पळून जाईल. चित्ता नदीच्या जवळ येण्याचे धाडस करणार नाही. मग अशा पद्धतीने तुझा मित्र वाचेल.

इतका विचारी सल्ला ऐकून कुत्रा खूप प्रसन्न झाला. पण अजून त्याला कळत नव्हते की सापाची योजना कोणत्या प्रकारे काम करेल? आनंदाने भुंकत तो समुद्र किनारी जितके जोरात पळता येईल तेवढ्या जोरात पळाला. तिथे जाऊन त्याने दगड आणि शंख गोळा केले.



जसे कुत्र्याला वाटले होते तसेच कासवाला चित्ताने पकडले होते. यावेळी चित्ता आपली पिशवी बरोबर घेवून आला होता. कासवाने वाचण्याचा प्रयत्न केला पण तो सफल झाला नाही.

एकदा परत चित्त्याच्या घरी स्वादिष्ट जेवणासाठी प्राणी जमले. जसा शेवटचा पाहुणा आला तसे चित्त्याच्या बायकोने पाहिले घरात पाणी नाही. चित्त्याने मुलांना पाणी आणायला नदीवर पाठवले. जेव्हा पाहुणे वाट पाहत होते तेव्हा चित्त्याने सांगितले की, कासव कसे त्याला नारळाच्या झाडाखाली सापडले. गोष्ट सांगता सांगता चित्ताने त्याला पंज्यात दाबले नंतर त्याने आपल्या हातात पकडले.

अचानक बाहेरून किंचाळण्याचा आणि ओरडण्याचा भीतीदायक आवाज ऐकू आले. भीतीने घाबरून चित्त्याची मुले नदीवरून परतले होते. खूप कष्टाने ते सांगू शकले की एक भयंकर दैत्याने त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता.



त्यांचे म्हणणे ऐकून लांडगा मुलांना हसू लागला. “मूर्ख,छोटे भित्रे, मला माहित नव्हतं तुम्ही इतके घाबरत आहात.” आणि तो स्वतः नदीवर गेला.लवकरच तो थर थर कापत घरी आला. तो भयभीत झाला होता. तो काहीच सांगू शकत नव्हता.

मग गोरिला गेला, तो ही लगेच परत आला. तो ओरडत होता, भीतीने कापत होता.

सिंह म्हणाला, “तुम्ही सगळे भित्रे आहात हे बघण्यासाठी मलाच नदीवर जावे लागेल.” लगेचच तो परत आला,त्याच्या गळ्यावरचे केस उभे राहिले होते. आणि त्याच्या डोळ्यात भीती होती. “मी अनेक वर्षांपासून इथे राहत आहे, त्याने भरलेल्या आवाजाने म्हटले. “पण कधी कोणत्या दैत्याचा आवाज ऐकला नाही.”

सगळे प्राणी घाबरले होते. “आपण काय करू शकतो?” त्यांनी एक दुसऱ्याला विचारले. मंद गतीने डोलत हत्ती उभा राहिला. “मी कोणालाच घाबरत नाही,” तो चित्कारला. “मी नदीवर जातो आणि माझ्या सोंडेत पाणी भरून घेवून येतो.”
घाबरलेले प्राणी त्याची वाट पाहू लागले. कोणी एक शब्दही बोलले नाही.
लवकरच हत्ती परत आला. दमलेल्या आवाजात तो म्हणाला, त्याने खूप भीतीदायक आवाज ऐकला. तो इतका घाबरला की तो सोंड खाली सुद्धा करू शकला नाही.





सगळे प्राणी भीतीने थर थर कापत होते. त्यांनी चित्त्याकडे पाहिले. त्याने धमकी दिली होती की जो कोणी नारळाच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करेल त्याचे तुकडे तुकडे तो करेल. म्हणून दैत्याशी लढण्यासाठी त्यालाच जावे लागेल.

पण चित्ता जितका स्वार्थी होता तितकाच तो भित्रा होता. नदीजवळ एकट्याने जाण्याचे धाडस त्याच्याकडे नव्हते. “माझ्या प्रिय मित्रांनो, “त्याने पटकन म्हटले, “माझी एक योजना आहे. जर आपण दैत्याला पकडून मारू इच्छितो तर आपल्याला एकजूट होऊन नदीवर जावे लागेल.”



सगळ्या प्राण्यामध्ये खळबळ माजली. काहींना चित्त्याची योजना योग्य वाटत होती. पण काही प्राणी भित्रे होते ते नदीवर जाऊ इच्छित नव्हते. शेवटी सगळे प्राणी नदीवर गेले. सिंह सगळ्यात पुढे होता. त्याच्या मागे चित्ता आणि हत्ती आणि इतर सगळे प्राणी होते.

जेव्हा शेवटचा भयभीत प्राणी सुद्धा गेला तेव्हा कासव, ज्याला सगळे विसरले होते. ते हळूच गुपचूप दरवाज्यातून बाहेर पडले आणि लवकर लवकर चित्त्याच्या घरापासून जितके दूर जाता येईल तितके दूर गेले.

जेव्हा ते दूर एका झाडाजवळ पोहचले तेव्हा त्याला प्रसन्नतेने भुंकण्याचा आवाज आला. तो त्याचा मित्र कुत्रा होता, जो पळत त्याच्याकडे आला आणि उड्या मारू लागला, आपली शेपटी हलवू लागला.

“मी त्यांना मूर्ख बनवले,” कुत्रा म्हणाला. “तो दैत्य मीच होतो.” कासवाने आपल्या मित्राकडे आश्चर्याने पाहिले.

“तू त्यांना बघायला पाहिजे होते,” कुत्रा हसत म्हणाला. “ते भीतीने कापत नदीच्या किनारी उभे होते. चित्ता सिंहाला ढकलत होता, हत्ती चित्त्याला ढकलत होता. गोरिला हत्तीला आणि लांडगा गोरील्याला ढकलत होता.”

“माझ्या प्रिय मित्र,” कासव म्हणाले, “मी विचार केला की, तू मला सोडून दिले. उलट तूने माझे प्राण वाचवले. मला वाटत होते की माझा शेवट जवळ आला आहे, पण तू मला वाचवले.
तुझे उपकार मी कसे फेडू?”

“अरे, हे तर काहीच नाही,” कुत्रा नम्रतेने म्हणला. ”मित्रा करता मी काहीही करू शकतो.”

आणि दोघे एक-दुसऱ्याचे हात पडकून निघून गेले.

समाप्त